# पुणेकरांना हवाय घरातच ऑक्सिजन!

## कॉन्सन्ट्रेटर मशिनच्या मागणीमध्ये मोठी वाढ

सकाळ EXCLUSIVE

**पुणे, ता. १६ : वडिलांना फुफ्फुसाचा संसर्ग झाला आहे. गेल्या दोन वर्षांपासून त्यांना सिलिंडरद्वारे ऑक्सिजन द्यावा लागतो. गेल्या महिनाभरापासून शहरात वणवण करूनही ऑक्सिजनचा सिलिंडर मिळत नाही. त्यांचा प्राण अक्षरशः कंठाशी आला. शेवटी या सिलिंडरचा नाद सोडला आणि 'ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर मशिन' घेतले... सागर कुलकर्णी बोलत होते.**

हवेतील प्राणवायू शोषून घेणाऱ्या 'ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर मशिन'ची मागणी शहरात दहा पटींनी वाढली आहे. ऑक्सिजन सिलिंडर सहजासहजी मिळत नसल्याने श्वसन आणि फुफ्फुस विकारांच्या रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी या मशिनशिवाय पर्याय राहिला नसल्याची वस्तुस्थिती समोर येत आहे.

शहरात गेल्या दोन महिन्यांपासून कोरोनाबाधित अत्यवस्थ रुग्णांची संख्या वेगाने वाढत आहे. त्यांना उपचारासाठी व्हेंटिलेटर आणि ऑक्सिजनवर ठेवावे लागते. रुग्णालयांमधून मोठ्या प्रमाणात ऑक्सिजनची मागणी वाढली. पुणे जिल्ह्यासह शहरात उत्पादित होणारा ऑक्सिजन आणि मागणी यात तफावत निर्माण झाली. शहरांमधील उपनगर आणि ग्रामीण भागातील रुग्णालयांमध्ये उपचारांसाठी दाखल असलेल्या रुग्णांना वेळेत पुरेसा ऑक्सिजन मिळण्यात अडथळे येत आहेत. ऑक्सिजनचा पुरवठा सुरळीत करण्यासाठी मागील दोन आठवड्यांपासून प्रशासनाकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. याच दरम्यान कोरोना झाल्याचे निदान झालेल्या काही रुग्णांनी ऑक्सिजन बेड मिळत नसल्याने घरी ऑक्सिजन सिलिंडर घेऊन ठेवल्याचे प्रकार उघडकीस आले. त्यामुळे रुग्णालयांना पुरेसा ऑक्सिजन पुरवठा होईल,

पान ४ वर »




### मशिनची वैशिष्ट्ये

- हवेतील ऑक्सिजन या मशिनद्वारे शोषून घेतला जा
- ९३ टक्क्यांपर्यंत शुद्ध ऑक्सिजन रुग्णाला मिळतो
- वीजपुरवठा खंडित झाला तर बॅकअप असतो.
- विजेवर उपकरण चालते.

### असा मिळतो शरीराला प्राणवायू

- एका श्वासातून अर्धा लिटर हवा आत जाते
- दिवसभरात १० हजार लिटर हवा आपल्या फुप्फुसात जाते
- दहा हजार लिटर हवेतून २१०० लिटर प्राणवायू मिळतो
- त्यापैकी १००० लिटर आपण शोषून घेतो

